**आकाशवाणी नागपूर,**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)**
**सोमवार, दिनांक १३ मे २०२४**

**ठळक बातम्या**

- **लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात आज राज्यात संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ५२ पूर्णांक ४९ शतांश टक्के इतकं मतदान.**
- **निवडणुका संपल्यावर कापूस उत्पादन शेतकऱ्यांच्या खात्यात थेट ४ हजार कोटी रुपये टाकले जाणार-धुळे इथल्या प्रचारसभेत भाजप नेते अमित शाह यांचं आश्वासन.**
- **खोदलेल्या रस्त्यांमुळे पावसाळयात नागरिकांच्या जीवाशी खेळ करु देणार नाही, रस्ते खोदकामाबाबत आमदार विकास ठाकरे यांचं मनपा आयुक्तांना पत्र.**
- **सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन (CBSE) चे आज इयत्ता 10वी आणि 12वी बोर्डाच्या परीक्षांचे निकाल जाहीर.**
- **आज आणि उद्या विदर्भाच्या अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यात वादळ आणि पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी.**

*****

मतदान आकडेवारी

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात नऊ राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशातील 96 लोकसभा जागांसाठी आज मतदान घेण्यात आलं आहे. यामध्ये आंध्र प्रदेशातील 25, तेलंगणातील 17, उत्तरप्रदेशातील 13, महाराष्ट्रातील 11, मध्य प्रदेश आणि पश्चिम बंगालमधील प्रत्येकी आठ जागा, बिहारमधील पाच आणि झारखंड आणि ओडिशामधील प्रत्येकी चार जागांचा समावेश आहे. जम्मू-काश्मीरमधील एका जागेसाठीही आज मतदान घेण्यात आलं. तेलंगणातील मतदार संघातील मतदारांच्या अधिक सहभागासाठी मतदानाची वेळ वाढवण्यात आली. याच टप्प्यात राज्यातील मराठवाड्यातल्या जालना, बीड आणि औरंगाबाद लोकसभा मतदार संघासह, राज्यातल्या पुणे, शिरुर, मावळ, अहमदनगर, शिर्डी, नंदुरबार, जळगाव आणि रावेर या एकूण ११ मतदारसंघाचा समावेश आहे. संध्याकाळी ५ वाजेपर्यन्त मतदानाची आकडेवारी समोर आली असून ५२ पूर्णांक ४९ टक्के इतकं मतदान झालं. यात सर्वाधिक मतदान नंदुरबार मतदार संघात ६०.६० टक्के तर सर्वांत कमी ४३.८९ टक्के शिरूर या मतदार संघात झालं आहे. आज अनेक मान्यवरांनी मतदान केलं. महाराष्ट्रातील पहिली मतदार रेवता तडवी हिने मनिबेली मध्ये मतदानाचा हक्क बजावला. छत्रपती संभाजीनगर इथ विधान परिषद विरोधी पक्षनेते आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट नेते अंबादास दानवे यांनी सहपरिवार मतदान केलं. राज्याचे आदिवासी विकास मंत्री विजय कुमार गावित यांनी नंदुरबार तालुक्यातील मुळगाव असलेल्या नटावद इथं मतदान केलं. काँग्रेस उमेदवार गोवाल पाडवी आणि त्यांचे वडील आमदार के.सी.पाडवी यांनी धडगाव तालुक्यातील असली इथं मतदानाचा हक्क बजावला. मावळ लोकसभा मतदारसंघात मराठी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी निगडी येथील ज्ञान प्रबोधिनी

नवनगर विद्यालय इथ आपला मतदानाचा हक्क बजावला.या टप्प्यातएकूण एक हजार सातशे 17 उमेदवार रिंगणात आहेत. प्रमुख उमेदवारांमध्ये केंद्रीय मंत्री आणि भाजप नेते गिरिराज सिंह, अर्जुन मुंडा, जी.किशन रेड्डी, अजय कुमार मिश्रा, जनता दल युनायटेडचे राजीव रंजन सिंह, समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव, काँग्रेसचे अधीर रंजन चौधरी, भाजपाचे रावसाहेब दानवे, महावीकस आघाडीचे चंद्रकांत खैरे, तृणमूल काँग्रेसचे महुआ मोईत्रा आणि शत्रुघ्न सिन्हा आणि ऑल इंडिया एमआयएम असदुद्दीन ओवेसी आदी उमेदवारांचे  निकाल आज मतदान यंत्रांत बंद झाले आहे.

मतदान विशेष बाब

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सिल्लोड इथं सुरमाबाई थोरात या १०७ वर्षाच्या आजींनी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर येऊन मतदानाचा हक्क बजावला. बीड लोकसभा मतदारसंघातल्या मतदान केंद्र क्रमांक ३५० च्या दोनशे मीटरच्या परिघात बचत गटांमार्फत खाद्यपदार्थांचे स्टॉल्स लावण्यात आले आहेत. बीड मतदारसंघातल्या कोरडेवाडी इथल्या ग्रामस्थांनी मतदानावर बहिष्कार टाकला आहे. साठवण तलावाच्या मागणीसाठी हा बहिष्कार टाकला असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. यावर लवकरच तोडगा काढला जाईल, अशी माहिती, उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी दिली. दरम्यान, बीड जिल्ह्यातल्या अंबाजोगाई इथं एका खाजगी वृत्तवाहिनीचे पत्रकार वैभव कनगुटकर यांचं आज सकाळी निधन झालं, ते ४८ वर्षांचे होते. आज सकाळी मतदान सुरू झाल्यानंतर मतदानाचं वार्तांकन करत असताना त्यांना अस्वस्थ वाटू लागलं आणि त्यातच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यांना तातडीने उपचारासाठी एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं.

प्रत्यक्ष मतदानाची आकडेवारी

प्रत्यक्ष मतदानाची आकडेवारी मतदानानंतर  २४ तासांच्या आत जाहीर करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला द्यावे अशी मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात येत्या शुक्रवारी, १७ मे रोजी सुनावणी होणार आहे. लोकसभा निवडणुकीची मतदानाची आकडेवारी प्रकाशित करण्यासाठी निवडणूक आयोग विलंब करत असून, मतदानाच्या दिवशी जाहीर केलेल्या सुरुवातीच्या आकड्यांमध्ये आणि अंतिम आकड्यांमध्ये ५ टक्क्यांहून जास्त फरक असल्याचं या याचिकेत म्हटलं आहे.

पाचवा टप्पा

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात येत्या २० मे रोजी मतदान होणार असून, यामध्ये राज्यातल्या धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे आणि मुंबईतल्या सहा मतदारसंघांचा समावेश आहे. या सर्वच मतदारसंघांमध्ये प्रचारानं आता वेग घेतला आहे.

भारताला जगातली तिसऱ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता बनवून देशाला एक सक्षम, बळकट विकसीत राष्ट्र करण्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची गॅरंटी आहे. भाजप सरकारने धुळे जिल्ह्यात ३ लाख घरात नळाव्दारे पाणी पोह्चवले, सुलवाडे जामफळ योजनेसह अनेक सिंचन योजनांसाठी २५०० कोटी रुपयांचा निधी दिला. सहा राष्ट्रीय महामार्ग बनवले, नवीन हायवे, रेल्वे मार्ग तयार करण्याचे कार्य पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फडणवीस यांच्या सरकारांनी केलं  आहे. महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी ४ हजार कोटीची भावातंर योजना आणली आहे, निवडणुका संपल्या की कापूस उत्पादन शेतकऱ्यांच्या खात्यात थेट हे ४ हजार कोटी रुपये टाकले जाणार आहेत. त्यामुळे  येत्या २० मे रोजी कमळ या चिन्हासमोरील बटन दाबून भाजपचे उमेदवार डॉ.सुभाष बाबा भामरे यांना विजयी करण्याचं आवाहन देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी धुळेकरांना आज केलं. धुळे शहरात आज दुपारी धुळे लोकसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमदेवार डॉ.सुभाष भामरे यांच्या प्रचारार्थ भाजपचे जेष्ठ नेते गृहमंत्री अमित शहा यांची जाहिर सभा झाली. यावेळी सुलवाडे जामफळ सिंचन योजनेसाठी २ हजार ७०० कोटी रुपये मोदींजीची दिले. त्यासाठी खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी मोठा पाठपूरावा केला असे सांगत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कॉंग्रेसवर  जोरदार हल्ला चढवला.

आमदार विकास ठाकरे

शहरात गेल्या वर्षभरापासून नुकतेच तयार केलेले आणि अनेक सुस्थितीत असलेले रस्ते खोदून पाईपलाईन टाकण्यात येत आहे. कंत्राटदार कंपनी खोदलेली माती, पाईप असा साहित्य रस्त्यावर सोडून देण्यात येत असल्याने दररोज अपघात होत आहे. यंदा पावसाळयापूर्वी सर्व कामे पूर्ण करुन, रस्त्यांची दुर्दशा होत असताना आपल्या कामात तडजोड करणाऱ्या मनपा अधिकाऱ्यांकडून त्यांच्या  दुरुस्तीची रक्कम वसूल करावी, तसेच या खोदलेल्या रस्त्यांमुळे पावसाळयात नागरिकांच्या जीवाशी खेळ करु देणार नाही, असा इशारा नागपूर शहर कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व आमदार विकास ठाकरे यांनी पत्राद्वारे मनपा आयुक्तांना दिला आहे. यापूर्वी नागपूरात आयोजित जी २० परिषदेसाठी महाराष्ट्र शासनाने २०० कोटींचा निधी मंजूर केला होता. यात तयार करण्यात येणारे रस्ते कुठल्याही कारणास्तव खोदण्यात येणार नाही अशी अट घालण्यात आली होती. मात्र आता याच निधीतून तयार करण्यात आलेले रस्ते पुन्हा खोदून शासनाच्या अटींचेही उल्लंघन मनपाकडून करण्यात येत आहे. या संदर्भातही ठाकरे यांनी ३ नोव्हेंबर २०२३ रोजी जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दिली होती.

लोकनिर्णय महाराष्ट्राचा

श्रोतेहो, 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात आजच्या भागात आपण 'वायव्य मुंबई' लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

हवामान

आज आणि उद्या विदर्भाच्या अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यात मेघगर्जनेसह, वादळ आणि पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. आज पासून येत्या १६ मे पर्यन्त नागपूरसह विदर्भाच्या सर्व जिल्ह्यात हलक्या ते मध्यम स्वरूपाची पर्जन्यवृष्टि होऊ शकते असा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे. दरम्यान गेल्या २४ तासात विदर्भातील अमरावती जिल्ह्यात सर्वाधिक ४१ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सियस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे. वाशिम आणि ब्रह्मपुरीमध्ये देखील ४१ अंशाच्या घरात तापमान असल्याने या सर्व ठिकाणी उष्मा -प्रतिबंधक उपाययोजना करण्याचं आवाहन स्थानिक प्रशासनाने केलं आहे. दरम्यान, मान्सून काळात येणाऱ्या पाऊस, पूर, वीज तसेच अन्य आपत्तींचे व्यवस्थापन करण्यासाठी सर्व यंत्रणांचा समन्वय व संपर्क आवश्यक आहे. वेळेवर संपर्क स्थापित करुन आपण प्रतिसाद देऊ शकतो, त्यासाठी सर्व यंत्रणांनी दक्ष व सज्ज राहावे, असे निर्देश अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी आज दिले. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली मान्सूनपूर्व आढावा बैठक महसूल भवनात झाली, त्यावेळी ते बोलत होते.

सीबीएससी-दहावी/बारावी निकाल

सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन अर्थात CBSE ने आज इयत्ता 10वी आणि 12वी बोर्डाच्या परीक्षांचे निकाल जाहीर केले. निकालांमध्ये मुलींनी मुलांवर बाजी मारली आहे. 87.98 टक्के विद्यार्थी 12वी बोर्डाच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्ण होण्याचे प्रमाण गेल्या वर्षीच्या तुलनेत 0.65 टक्क्यांनी अधिक आहे. या परीक्षेत २४ हजारांहून अधिक उमेदवारांनी ९५ टक्क्यांहून अधिक गुण मिळवले असून एक लाख सोळा हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवले आहेत असे सीबीएसईने एका निवेदनात म्हटले आहे.10वी बोर्डाच्या परीक्षेत एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी 93.60 इतकी आहे. मुलींचे उत्तीर्णतेचे प्रमाण 94.75 आहे, तर मुलांचे प्रमाण 92.71 आहे. निकाल www.cbseresults.nic.in, www.cbse.gov.in तसेच डिजीलॉकर आणि उमंग ॲप्ससह वेबसाइटवर पाहता येतील.

परीक्षांच्या वेळापत्रकात बदल

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी-2024 परीक्षांच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला असून सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलं आहे. या संदर्भात सर्व संबंधित महाविद्यालयांना परीक्षा विभागाकडून कळविण्यात आलं असून विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या प्रभारी संचालक मोनाली तोटे पाटील यांच्याशी 9763833969 या क्रमांकावर संपर्क साधावा असं आवाहन करण्यात आलं आहे.

*****